ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

भारतातील बँकिंग व्यवसायाचा एक अभ्यास

** डॉ. राजाभाऊ किसनराव गायवळ*

** मु.कोरटेक पो.खडका ता.सोनपेठ जि.परभणी.*

गोषवारा:

भारताच्या मुद्रा बाजारात सर्वात विस्तृत संगठीत बँकांचे क्षेत्र व्यापारी बँकानी व्यापली आहे. शहरी भागात सर्वसाधारण व्यापारांच्या, उत्पादकांच्या अल्पकालीन कर्जाच्या गरजा व्यापारी बँकांकडून पूर्ण केल्या जातात. अशा या महत्त्वाच्या बँकिंग क्षेत्राचा विकास भारतात व त्यातही प्रामुख्याने स्वतंत्र काळात कसा होत गेला. व्यापारी बँका हा काही एतदेशीय प्रकार हा जॉइंट स्टॉक कंपनीद्वारे बँका व्यवहार चालवण्याची एक पद्धत ही मुळात विदेशी आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत प्रथम काही ब्रिटिश एजन्सी गृहेही ठेवी स्वीकारणे, कर्ज देणे यासारखे बँका व्यवहार करीत असत. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच देशात ब्रिटिशांनी काढलेली स्कंध बँक स्थापन होऊ लागली. यात प्रेसिडेन्सी बँका प्रमुख होत्या, बँक ऑफ बेंगाल १८३० मध्ये, बँक ऑफ बॉम्बे १८४६ मध्ये, व बँक ऑफ मद्रास १८४३ मध्ये स्थापन झालेल्या आहे. तत्कालीन परिस्थितीत व्यापारी बँकांव्यतिरिक्त या बँका आपापल्या पत्र मुद्रा निर्गमित करत असत. एका अर्थाने व्यापारी बँकांची वाढ १८६० नंतर होऊ लागली व अनेक बँका त्यानंतर स्थापन झाल्या. १८६५ मध्ये इंडिया बँक, १८५५ अल्लाहाबाद बँक, १८९४ मध्ये पंजाब नॅशनल बँक स्थापन झाल्या, तरी पण १९ या शतकांत बँकांची प्रगती साधारणत होती. भारतात निघालेल्या आतापर्यंतच्या सर्व बँका युरोपीयांनी काढल्या होत्या. विसाव्या शतकात स्वदेशी आंदोलनामुळे भारतीयांना संयुक्त स्कंध अधिक स्थापन करण्याची प्रेरणा मिळाली व बँकाची संख्या वाढत गेली.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

(१) बँकाची उत्क्रांती अभ्यासणे.

(२) बँक व्यवसायाच्या विविध टप्प्याचा अभ्यास करणे.

(३) बँकाच्या कर्ज पुरवठ्याचा अभ्यास करणे.

आभासाची गृहीतके :

(१) बँकिंग क्षेत्राचा विकास होत आहे.

(२) बँकाच्या कर्ज पुरवठ्यात वाढ झाली.

(३) आधुनिक काळात बँकांचे महत्व वाढत आहे.

(४) बैंकिंग प्रणाली मध्ये तांत्रिक बदल दिवसेंदिवस घडून येत आहेत.

संशोधन पद्धती : सदरील विषयाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीय साधन सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे, त्यासाठी वर्तमान पत्र विविध साप्ताहिके, मासिके, नेट्वर्किंग या मध्ये विविध वेबसाईट आणि निवडक पुस्तकांचा वापर करण्यात आला.

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

बँक व्यवसायाच्या उत्क्रांतीचे विविध टप्पे :

भारतातील बँक व्यवसायाची उत्क्रांती कशी आणि कोणत्या पद्धतीने होत गेली. त्यासाठी विविध टप्पे पाहणे उध्बोधक ठरेल.

एजेंसी हाऊसेस : एका एजन्सी हाउसेसने भारतामध्ये १७७० साली बँक ऑफ हिंदुस्तान या बँकेची स्थापना करण्यात आली. या बँक स्थापनेनंतर अनेक बँकांची निर्मिती झाली. परंतु त्यांची निर्मिती झाल्यानंतर लगेच त्या बँका बंद सुद्धा झाल्या. परंतु त्यानंतर मात्र देशात विविध ठिकाणी कोणीही बँका सुरू करू शकल होते, कारण हे क्षेत्र सर्वांना खुले झाले होते. बँका सुरू करण्या मध्ये एजेंसी हाऊसेसचा मोलाचा वाटा आहे, भारलात बँक उत्क्रांतीचा हा पहिला टप्पा समजला जातो.

प्रेसिडेन्सी बँका : भारतावर राज्य करणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीने प्रेसिडेंसी बँकांच्या भागभांडवलामध्ये २० टक्के सहभाग नोंदवून त्यांची स्थापना केली. १८०६ ते ९८४० आणि १९४३ मध्ये अनुक्रमे बँक ऑफ बंगाल, बँक ऑफ बॉम्बे, बँक ऑफ मद्रास इत्यादी बँकांची स्थापना करण्यात आली, हा बँकाचा उत्क्रांतीचा दुसरा टप्पा कालखंड समाजाला जातो.

संयुक्त भांडवली संस्था : १८८४ मध्ये मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर संयुक्त भांडवली संस्थाना बँकांची स्थापना करण्यात परवानगी देण्यात आली. त्यामुळे बँकांच्या स्थापनेस खरी चालना मिळाली. त्यानंतरच्या शतकामध्ये भारतीयांच्या प्रयत्नाने पंजाब नॅशनल बँक, अलाहाबाद बँक, बँक ऑफ बडोदा, यासारख्या बँकांची स्थापना करण्यात आली.

इम्पेरिअल व बँक ऑफ इंडिया : परकीय बँकांच्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी तीन प्रेसिडेन्सी बँकांचे विलीनीकरण करण्यात आले. १९२१ मध्ये इम्पेरिअल बँक ऑफ इंडिया, या एका शक्तीशाली बँकेची स्थापना करण्यात आली. या बँकेच्या संपूर्ण देशभरात शाखांचे जाळे पसरले, त्यानंतर या बँकेचे १९५५ मध्ये राष्ट्रीयकरण करण्यात आले. तीच आजची स्टेट बँक ऑफ इंडिया आहे.

भारतीय रिझर्व्ह बँक : भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना हा काळ बँकांच्या ऊर्जितावस्थेचा असला, तरी कोणत्याही प्रकारच्या नियमावलीत अशा वेळेवर सवलती न मिळाल्याने अनेक बँका अपयशी ठरल्या. त्यामुळे लोकांच्या मनात बँकाबद्दल शंका निर्माण होऊ लागल्या. १९३५ मध्ये कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी १९३५ मध्ये केंद्रीय बँक म्हणून कार्य करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्यात आली. विषेतः बैंक ऑफ इंग्लंड च्या धर्तीवर या बँकेची रचना करण्यात आली. परंतु तिला विशेष अधिकार नव्हते, त्यानंतरचा काळ हा मंदीचा व दुसऱ्या महायुद्धाचा होता. या काळामध्ये बँक व्यवसायाबाबत रिझर्व्ह बँक समाधानकारक कार्य करू शकली नाही.

बँक व्यवसाय नियमन कायदा : रिझर्व्ह बँकेने १९४९ मध्ये दोन महत्त्वाची पावले उचलली गेली, भारताला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर रिझर्व्ह बँकेला नियमन आणि नियंत्रणाचे विस्तृत अधिकार देण्यात आले. हे अधिकार वापरून रिझर्व्ह बँक, भारतीय बँक व्यवसाय खात्रीलायक बनवेन अशी खात्री वाटली, परंतू लवकरच या बँकेचे अपयश भूतकाळात जमा झाले. आणि भारतीय बँक व्यवसायात खऱ्या अर्थाने

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

विकसित व सुरू होऊन रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनाखाली आपले कार्य सुरु केले.

मधील बँकांचे राष्ट्रीयकरण : १९६९ मध्ये १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले. त्यानंतर १९८० मध्ये आणखी सहा बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. या मुळे बँकांची कार्य, कार्यपद्धती, धोरणे, अभिवृत्ती इत्यादीमध्ये महत्त्वपूर्ण बदल झाले. सध्याच्या काळात भारतीय बँका आंतरराष्ट्रीय सहभागी म्हणून कार्य करण्यासाठी तयार झाल्या आहेत. राष्ट्रीयीकरण झाल्या नंतर बँकिंग व्यवसायात मोठ्य प्रमाणात विकास घडून येण्यास सुरुवात झाली.

पाश्चिमात्य राष्ट्रामधील बँकिंग व्यवसाय : अधिकोषांच्या उत्क्रांती बाबत पाश्चिमात्य देश आणि भारत असे दोन प्रकार विचारात घेऊन विवेचन करणे योग्य ठरते, सर्वप्रथम पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये आधिकोषाची सुरुवात कशी झाली.

प्राचीन कालखंड : इ.स. २००० मध्ये बॅबीलोनमधील पुजाऱ्यांनी 'बँक' व्यवसायाला सुरुवात केली. त्या काळात लोक आपल्या मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी मंदिरांचा उपयोग करत. कारण त्या काळात लोकांची देवाधर्मावर नितांत श्रद्धा होती थोडक्यात असे म्हणता येईल कि, ख्रिस्तो शतकापूर्वी २००० वर्षापासून 'बॅबीलोन' संस्कृतीमध्ये ही संस्था अस्तित्वात असल्याचा पुरावा सापडतो. बॅबीलोन येथील मंदिरातून बँकेचा व्यवसाय चालत असे.

मध्ययुगीन काळ : मध्ययुगात राजे लढाया करत आणि त्यांना प्राप्त होणारी संपत्ती आणि मालमत्ता सुरक्षित राहण्यासाठी संपत्ती जमिनीत पुरून ठेवीत असत. आजही ही संपत्ती बऱ्यात वेळा उत्खननात सापडते. त्यामुळे त्याकाळात स्वतःजवळ पैसा किंवा धन सुरक्षित ठेवण्याचा प्रभावी मार्ग होता बँकेच्या उत्क्रांतीचा विचार करीत असताना पाश्चिमात्य देशातील इटली आणि ग्रीक या दोन देशाचा विचार केला जातो. या दोन देशातील काही शहरे ही व्यापारासाठी जगप्रसिद्ध होती. व्यापारांचा संबंध संपत्तीशी पैशाशी सुद्धा येतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पैसे कर्ज देण्याचे व्यवहार आणि कर्जाऊ स्वरूपात देण्याचे व्यवहार ग्रीक आणि इटली या देशात खासगी स्वरूपात केले जात होते. इटली हा देश रोमन लोकांसाठी अतिशय प्रसिद्ध

असा देश होता. इटलीमार्गे आणि पश्चिम गोलार्धातील देशांमधील व्यापार, व्हेनिस जिनोवा हा लॉरेंस इत्यादि मार्गाने होत असे. तेथे आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी बँका आणि संस्थाची स्थापना झाली असे अनेक पुरावे सापडतात.

दहावे आणि तेराव्या शतकातील बँकाचा विकास : तेराव्या शतकापासून पुढील काळात बँकाचे पुनर्जीवन होऊन बँक व्यवसायाच्या प्रगतीला चालना मिळाली. बाराव्या शतकातील बँकांच्या विकासाला अनेक खाजगी व्यक्तीचा हातभार लागला, त्यात खाजगी लोकांनी बँकाचा व्यवसाय सुरू केला. परंतु त्यामध्ये 'ज्यू' लोकांचा हिस्सा मोठ्या प्रमाणात होता. त्याच काळामध्ये 'ज्यू' लोकांना कोणत्याही प्रकारचा व्यापार उद्योग करण्याचा हक्क नव्हता. त्याचबरोबर जमिनीवरील स्वामित्वाचा अधिकारही नव्हता. म्हणून 'ज्यू' लोकांनी आपली पूर्वलक्ष अधिकोष व्यवसायावर केंद्रित केल्याचे दिसून येते, अशा पद्धतीने 'ज्यू' लोकांनी अधिकोष व्यवसायाचे पुनर्जीवन बाराव्या शतकात इटली मध्ये यशस्वीरित्या केले आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने बँकाचा

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

प्रसार व विकास झाला असे म्हटले जाते.

१५ वे शतक : पंधराव्या शतकापासून पुढील काळात इंग्लंड मध्ये १५४५ मध्ये मंजूर केलेल्या कायद्यानुसार उधार दिलेल्या रक्कमेवर व्याज घेण्याचे इंग्लंडच्या राजाने मान्यता दिली. त्याला धार्मिक नेत्यांनी व धर्मगुरूनी विरोध केला. १५५२ मध्ये कायदा रद्द करण्यात आला. १५७९ मध्ये इंग्लंड मध्ये रद्द केलेला कायदा पुन्हा १५४५ मध्ये स्वीकारण्यात करण्यात आला. इंग्लडमध्ये अनेक 'कॅथोलिक' लोकांच्या धार्मिक भावनाच्या विरोधातील हा निर्णय क्रांतिकारक होता, असे अनेक तज्ञांचे मत होते. १६२४ मध्ये अधिकोष व्यवसायाच्या अनुषंगाने मंजूर केलेल्या कायद्यानुसार कर्जरूपाने दिलेल्या रक्कमेवर जास्तीत जास्त आठ टक्के व्याज देण्यास परवानगी देण्यात आली. ट्यूडर घराण्याच्या राजवटीत सावकारी करण्यासाठी 'इंग्लंड' मध्ये मान्यता मिळाली. १६२४ साली प्रथम कायदा करून जास्तीत जास्त दर साल दर शेकडा, आठ टक्क्यांपर्यंत व्याज द्यायला परवानगी देण्यात आली. बँक ऑफ स्वीडन, 'बँक ऑफ व्हेनिस' सारख्या 'बँका' इंग्लंड मध्ये स्थापना करण्यात आल्या.

विल्यम पॅटरसन यांची सूचना लक्षात घेऊन इ.स. १६१४ मध्ये बँक ऑफ इंग्लंडची स्थापना करण्यात आली.

पाश्चिमात्य राष्ट्रात झालेला बँकांचा उगम:

अ.क्र.	वर्षे	तपशील
१	१६७२	सॉनाराकडून घेतलेले कर्ज दुसऱ्या चार्ल्स राजाने १३.२८ लक्ष पौंड.
२	१६९४	बँक ऑफ इंग्लंड ची स्थापना.
३	१६९६	बँक ऑफ इंग्लंडने चालनविषयक सुधारणा घडवून आणल्या
४.	१७०८	बँक ऑफ इंग्लंडची मुद्दत वाढविण्यात आली.
५	१७०८	संयुक्त भांडवली बँकाना कागदी चलन काढण्यात बंदी घालण्यात आली
६	१७५१	बँक ऑफ इंग्लंडवर सरकारी व सार्वजनिक कर्ज व्यवस्था पहाण्यासाठी जबाबदारी सोपविण्यात आली.
७	१८२३-२४	या वर्षात मोठ्या प्रमाणात व्यापारी बँकाकडून कर्ज वितरण
८	१८२५	या वर्षात आर्थिक समस्यामुळे अनेक खाजगी बँकाचे दिवाळे निघाले.
९	१८२६	या कायद्यानुसार संयुक्त भांडवली बँकाचे कार्यक्षेत्र ६५ मैलापालीकडे निश्चित करण्यात आले.
१०	१८३३	या कायद्यानुसार लंडन व आजूबाजूच्या ६५ मैलात खाजगी बँकाना व्यवसाय सुरू करण्यात मंजूरी देण्यात आली. परंतु चलन निर्मिती करण्यावर बंदी घालण्यात आली.
११	१८४४	इंग्लिश कंपनीज ॲक्ट मंजूर करण्यात आला.
१२	१८५०	प्रथम कंपनी कायदा हा, १८४४ च्या इंग्लिश कंपनीज ॲक्टवर आधारित होता. या कायद्यात अमर्यादित जबाबदारीचे तत्व दिलेले होते. हे तत्व बँकाना लागू करण्यात आले.
१३	१८५७	१८५० चा कंपनीज ॲक्ट ७ वर्षा नंतर रध्द केला आणि १८५७ चा नवीन कायदा अमलात आला.
१४	१९५८	संयुक्त भांडवली बँकाना मर्यादित जबाबदारीचे तत्व लागू करण्यात आले, हे तत्व १८५७ पासून बँकाना 'लंडन क्लियरिंग हाऊस' मध्ये प्रवेश देण्याचे मान्य केले.
१५	१८७७	अनेक व्यापारी बँकाचे एकत्रीकरण करण्यात आले.
१६	१८७७-१९०७	या काळात २०० बँकाचे मोठ्या बँकेत विलीनीकरण करण्यात आले.
१७	१९०७	१९०७ नांतरच्या काळात लाईड्स बैंक, बर्लेज बँक, दि. मिडलंड बँक, दि. वेस्ट मिनिस्टर बँक, दि. नेशन प्रव्हिंन्शिअल बँक या पाच बँकाकडे 'इंग्लंड' मधील आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणात केन्द्रित झाले.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

भारतीय अर्थव्यवस्था, लेखक, बालासाहेब नारायनराव घाटगे, निराळी प्रकाशन, पेज. नं. ४०.१

वरील तक्यावरुन असे दिसून येते की बँक व्यवसायाची पाश्चिमात्य देशातील आणि विशेषतः इंग्लंड मधील उत्क्रांती कशी झाली याचा अंदाज येतो.

बँकाचा अग्रक्रम क्षेत्रांना केलेला कर्जपुरवठा (३१ मार्च २०२०-२१)

क्षेत्र	सार्वजनिक बँका	खाजगी बँका	परकीय बँका	लघुवित बँका
एकूण अग्रक्रम कर्ज पुरवठा	४९.०५%	४०.३२%	४०.८०%	८८.२२%
एकूण कृषी कर्ज पुरवठा	१७.२३%	१५.९६%	१८.२५%	२६.९४%
लघु व सिमांत शेतकरी	९.१९%	२.२७%	८.३८%	२५.२७%
शुक्ष्म उपक्रम	७.०३%	८.०३%	७.६४%	२९.५३%
दुर्बल घटक	१२.१३%	१०.७८%	१०.५६%	५८.५९%

भारतीय अर्थव्यवस्था, लेखक राजन कोळंबे, MPSC भगिरथ प्रकाशन पुणे, पे.नं. १६०,

वरील तक्यावरुन असे दिसून येते की, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी एकूण निव्वळ कर्ज पुरवठ्या पैकी अग्रक्रम क्षेत्राला लेलेला कर्जपुरवठा सतत वाढत गेला. जून १९६० मध्ये तो १२% होता. राष्ट्रीयकरणा नंतर मात्र तो आणखीनच वाढला, रिजर्व्ह बँकेच्या अहवालानुसार २०२०-२१ साली भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकानी मिळून निव्वळ वार्षिक कर्ज पुरवठ्यापैकी ४१.०५%, परकीय बँकानी मिळून ४०.८०%, तर लघु वित बँकानी मिळून ८८.२२ % अग्रक्रम क्षेत्रांना कर्जपुरवठा केला, सार्वजनिक बँकानी अग्रक्रम कर्जापैकी कृषि क्षेत्रांला १७.२३% तर खाजगी बँकांनी १५.९६% एवढा केला. परकीय बँकांनी १८.२५%, लघुवित २६.९४% बँकानी एकूण कृषी कर्ज पुरवठा केला. लघु व सीमांत शेतकरी यांना केलेला कर्ज पुरवठा, सार्वजनिक बँकाचा ९.११%, खाजगी बँकाचा २.२७%, परकीय बँकाचा ८.३८%, लघुवित बँकाचा २५.२७%, येवढा केला. शुक्ष्म उपक्रमाना केलेला कर्ज पुरवठा, सार्वजनिक बँकाचा ७.०३%, खाजगी बँकांनी केलेला कर्ज पुरवठा ८.०३%, परकीय बँकाचा ७.६४%, लघु व वीत बँकाचा २९.५३%, येवढा कर्ज पुरवठा केला. दुर्बल घटकांना केलेला कर्ज पुरवठा सार्वजनिक बँकांनी १२.१३%, खाजगी बँकांनी १०.७८%, परकीय बँकांनी १०.५६%, लघु वीत बँकांनी ५८.५९%, येवढा कर्ज पुरवठा केला गेला.

अधिकोषांचे महत्त्व :

बँकांच्या कार्यावरून स्पष्ट होते की, बँका व्यापार व उत्पादनाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत. बँका बाजारातील एक प्रमुख घटक आहेत. देशाचा आर्थिक विकास करायचा असेल तर बँकांकडे महत्त्वपूर्ण नजरेने पाहिले जाते. बँका ह्या व्यापार उद्योग व्यवसाय यांच्या रक्तवाहिनीचे 'केंद्र बिंदु आहेत. परंतु देशाचा आर्थिक विकास आज सर्वच बँकांच्या कार्यावर अवलंबून आहे. बँका बचतीला प्रोत्साहन देऊन भांडवलाची निर्मिती सहज करत असतात. भांडवलाची गती क्षमता व उत्पादन क्षमता वाढवून विदेशी व्यापाराला पोषक ठरून देशाच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणावर सहकार्य करण्याचे काम बँका करतात. म्हणून आज बँकेचे महत्व अत्यंत मोठे आसल्याचे दिसून येते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

संदर्भ :

१) maharashtratimes.com

२) भारतीय अर्थव्यवस्था, लेखक. राजन कोळंबे, MPSC भगिरथ प्रकाशन पुणे. पेज.नं. १६०,

३) भारतीय अर्थव्यवस्था, लेखक, बालासाहेब नारायनराव घाटगे, निराळी प्रकाशन, ४०.

४) न्यूस पेपर

५) इंटरनेट

Cite This Article:

डॉ. गायवळ रा. कि. *(2025). भारतातील बँकिंग व्यवसायाचा एक अभ्यास.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number I, pp. 191–196) Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16490342